**CNR No. MHND240004692023**

नि. दि. दा. क्र. १२१/२०२३
उषा वि. संभाजी चव्हाण

# निशाणी १३ खालील आदेश

१. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्ज त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हा दाव्यासंबंधी माहिती गोळा करीत असताना त्यानंतर वादी व वादीचे वडील यांनी प्रतिवादीवर कत्तीने प्राणघातक हल्ला करुन गंभीर जखमी केले. त्यात प्रतिवादी हा ३ महिने डॉक्टरच्या निगराणीखाली होता. त्यामुळे प्रतिवादी यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. म्हणून त्यांच्याविरुद्ध विनाकैफियत आदेश झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्दचा विना कैफियतचा आदेश रद्द करणे न्यायवह आहे.

३. या उलट, वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीस दाव्यातील समन्स मिळुन सुध्दा प्रतिवादीने त्याचे म्हणणे/उत्तर दाखल केलेले नाही. तसेच अर्जातील कारण संयुक्तीक नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादीविरुद्ध हिंदु दत्तक व पोटगी मिळण्याकरीता तसेच प्रतिवादी यांच्या नावे असलेल्या जमीवार वादीचा मंजूर केलेला पोटगीचा बोजा कायम करण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीविरुद्ध दि. ०७/११/२०२३ रोजी विनाकैफियत आदेश पारित होऊन देखील सदरचा अर्ज दि. ०६/०९/२०२४ रोजी म्हणजे १० महिन्यांच्या कालावधीनंतर दाखल केलेला दिसून येतो. त्यामुळे प्रतिवादीला कैफियत दाखल

करण्यास बराच विलंब झालेला दिसून येतो. तसेच कैफीयत दाखल करण्यास त्यांना जो विलंब झाला त्याचे कारण देखील उचित वाटत नाही. परंतु, प्रतिवादीस त्यांची कैफियत देऊन त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळावी व दावा गुणवत्तेवर निकाली काढता यावा, याकरिता, प्रतिवादीस संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. तसेच न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. मात्र प्रतिवादीने केलेल्या विलंबामुळे वादीस जो असोयीस्करपणा झाला, त्याकरीता प्रतिवादीस खर्च लावणे योग्य व संयुक्तिक आहे. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. सदरचा अर्ज प्रतिवादीने वादीला रक्कम रु. ५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीच्या विरुद्ध झालेला विनाकैफियत आदेश रद्द करण्यात येतो व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

स्वाक्षरीत /–

**(श्रीमती ए. टी. गित्ते)**

दि. १७/०२/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगांव